॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे

**✻ सुविचार ✻**
शब्दांपेक्षा कृतीवर जास्त भर द्या,
कारण जग बोलणाऱ्याला नाही
तर करून दाखवणाऱ्याला मान देते.

अहिल्यानगर | गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ११२ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# औषधांच्या तपासणीसाठी राज्यात ‘ड्रग डिटेक्शन मशीन’

## औषधांची गुणवत्ता दोन मिनिटांत तपासली जाणार । ८ विभागांत १६ अधिकाऱ्यांची पथके तैनात

**● मुंबई । वीरभूमी –**
शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण औषधे मिळावीत, यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील आठ विभागांमध्ये आधुनिक ‘ड्रग डिटेक्शन मशीन’ यंत्रणा कार्यान्वित केली आहे. या यंत्राद्वारे औषधांच्या नमुन्यांची अवघ्या दोन ते तीन मिनिटांत प्राथमिक तपासणी करता येणार आहे. तपासणीत संशयास्पद आढळणारे नमुने पुढील पडताळणीसाठी शासनमान्य प्रयोगशाळेत पाठविण्यात येतील, अशी माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

आरोग्य भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त डॉ. संजय काटकर आणि डॉ. सुनील भोकरे उपस्थित होते. यावेळी औषध शोधयंत्राचे प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले.

भारतीय शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रमण यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ‘रमण इफेक्ट’ तंत्रज्ञानावर हे यंत्र कार्य करते. यापूर्वी औषधांच्या गुणवत्तेबाबत तक्रार आल्यानंतर तपासणी केली जात होती. आता मात्र शासकीय आरोग्य संस्थांमधील औषधांच्या नमुन्यांची नियमित आणि अचानक तपासणी केली जाणार आहे.

औषध खरेदीपासून रुग्णालयांपर्यंत पुरवठा होण्याच्या प्रक्रियेत गुणवत्ता नियंत्रण, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने संशयास्पद औषधांचे नमुने वेळीच ओळखून त्यांची प्रयोगशाळेत पडताळणी करता येणार आहे. त्यामुळे औषध खरेदी व पुरवठा व्यवस्थेवर अधिक प्रभावी देखरेख ठेवणे शक्य होईल, असे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.



राज्यातील आठ विभागांमध्ये प्रत्येकी दोन सदस्यांची स्वतंत्र पथके तयार करण्यात आली आहेत. एकूण १६ अधिकारी या यंत्रणेद्वारे औषध तपासणीचे काम करणार आहेत. संबंधित अधिकाऱ्यांना यंत्राच्या वापराचे प्रशिक्षण देण्यात आले असून, आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली ही पथके कार्यरत राहतील. दर महिन्याला यादृच्छिक पद्धतीने औषधांचे नमुने गोळा करून त्यांची तपासणी केली जाणार आहे.

ड्रग डिटेक्शन मशीनद्वारे होणारी तपासणी प्राथमिक स्वरूपाची आहे. एखाद्या नमुन्याबाबत संशयास्पद किंवा नकारात्मक निष्कर्ष आढळल्यास तो नमुना शासनमान्य प्रयोगशाळेत पाठविण्यात येईल. राज्यात अशा तपासणीसाठी १२ शासनमान्य प्रयोगशाळा उपलब्ध असल्याचे विभागाने सांगितले. नमुना पाठवल्यानंतर साधारण आठ दिवसांत अहवाल मिळण्याची अपेक्षा आहे.

निविदा प्रक्रियेत सादर केलेल्या औषधांच्या नमुन्यांशी प्रत्यक्ष पुरवठा झालेल्या औषधांची तुलना करताना काही तफावत असल्यास तीही या यंत्रणेमुळे निदर्शनास येऊ शकते. प्रयोगशाळेच्या तपासणीत औषधांच्या गुणवत्तेबाबत त्रुटी, बनावटपणा किंवा नियमबाह्य बाबी आढळल्यास प्रचलित नियमांनुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

औषधांबाबत नियामक कारवाई करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाची आहे. मात्र, संशयास्पद नमुन्यांची माहिती संबंधित यंत्रणेपर्यंत पोहोचवून आवश्यक कारवाईसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग पाठपुरावा करणार आहे. सध्या ही तपासणी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयांसाठी खरेदी केलेल्या औषधांपुरती मर्यादित राहणार आहे.

राज्यात सुमारे एक हजार ९७० प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि १० हजार ८४६ उपकेंद्रे विकसित करण्याचे नियोजन आहे. या केंद्रांमध्ये औषधे, इंजेक्शन्स आणि डे-केअर सुविधांसह आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे विभागाने सांगितले.

राज्यातील आरोग्य यंत्रणेतील मनुष्यबळ वाढविण्यासाठी ४ नोव्हेंबर रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे एक हजार ४४० डॉक्टरांना नियुक्तिपत्रे देण्याचे नियोजन आहे. याशिवाय एक हजार ९०० कम्युनिटी हेल्थ ऑफिसर्सच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू असून, परीक्षा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील आठ ते १५ दिवसांत नियुक्तिपत्रे देण्याची कार्यवाही अपेक्षित आहे.

या नियुक्त्यांमुळे दुर्गम, आदिवासी, कोकण आणि ग्रामीण भागातील आरोग्य सेवा बळकट होण्यास मदत होईल. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या पार्श्वभूमीवर १५ हजार कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदांवर सामावून घेण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. याशिवाय १५ ऑगस्ट रोजी १२५ आरोग्य संस्थांचे लोकार्पण करण्यात आले असून, आणखी १२५ संस्थांचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

तालुका व विधानसभा मतदारसंघनिहाय आरोग्यवर्धिनी समित्यांच्या माध्यमातून आरोग्य सेवांचा नियमित आढावा घेतला जाणार आहे. आमदारांनी दर तीन महिन्यांनी आरोग्य सुविधांचे परीक्षण करावे, तर मंत्रालय स्तरावर दर सहा महिन्यांनी आढावा घेऊन आवश्यक सुधारणा निश्चित केल्या जाणार आहेत.

ग्रामस्तरीय जनआरोग्य समित्या, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्या आणि विविध आरोग्य संस्थांशी संबंधित समित्यांना ऑनलाइन जोडण्याची कार्यवाही सुरू आहे. यामुळे नागरिकांना आरोग्य सेवांमधील अडचणींबाबत तक्रारी नोंदविणे शक्य होणार आहे. चालू वर्षात १० लाख जनआरोग्य समिती सदस्य जोडण्याचे उद्दिष्ट असून, आतापर्यंत सुमारे साडेसहा ते सात लाख सदस्य जोडले गेल्याचे विभागाने सांगितले.

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### अस्थिर

जीवन अस्थिर असते
माणूस शोधतो स्थिरता
पैसे मिळतात भरपूर
माणूसकी हरवता
दुसऱ्याच आयुष्य चांगलं
ही प्रत्येक मनाची कथा
स्टेट्सच्या झगमगाटामागे
असते अडचणीची व्यथा

## SPOT NEWS

### दवाळीआधी तांदूळ महागला; सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले

**● मुंबई** – दिवाळीच्या काळात सर्वसामान्यांच्या जीवनावश्यक वस्तूंना महागाईचा मोठा फटका बसला आहे. दुष्काळ आणि कमी पावसामुळे तांदळाच्या उत्पादनात मोठी घट झाल्याने किलोमागे २५ ते ३० रुपयांनी दर वाढले आहेत. डाळींचे भावही वाढले असून, यामुळे सामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. महाराष्ट्रात सध्या दुष्काळ आणि कमी पावसामुळे शेती उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे, ज्याचा थेट फटका आता सर्वसामान्य नागरिकांना बसू लागला आहे. दिवाळी तोंडावर असताना तांदळाचे दर प्रति किलो २५ ते ३० रुपयांनी वाढले आहेत. तांदळाच्या उत्पादनात ५० ते ६० टक्क्यांनी घट झाल्यामुळे ही दरवाढ झाल्याचे समोर आले आहे.

### सुदानमध्ये भीषण ड्रोन हल्ल्यात १२० ठार

**● नवी दिल्ली** – सुदानमध्ये सुरू असलेल्या गृहयुद्धादरम्यान लष्कराने केलेल्या भीषण ड्रोन हल्ल्यात १२० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून ११३ जण जखमी झाले आहेत. दक्षिण दारफूरची राजधानी असलेल्या न्याला शहरातील एका गजबजलेल्या बाजारावर सोमवारी संध्याकाळी हा प्राणघातक हल्ला करण्यात आला. इमर्जन्सी लॉयर्स या स्थानिक मानवाधिकार संघटनेने मंगळवारी या घटनेची माहिती दिली. मानवाधिकार संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, बाजारात नागरिकांची मोठी गर्दी असताना अचानक ड्रोनद्वारे बॉम्बवर्षाव करण्यात आला. यामुळे संपूर्ण बाजारपेठेत रक्ताचा सडा पडला होता.

## सणासुदीच्या काळात सायबर फसवणुकीचा धोका वाढणार

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**
दिवाळीसह सणासुदीच्या काळात ऑनलाइन खरेदी, डिजिटल व्यवहार, प्रवासाचे आरक्षण आणि कुरिअर सेवांचा वापर वाढत असल्याने सायबर गुन्हेगार सक्रिय होण्याची शक्यता आहे. या काळात फिशिंग, आर्थिक फसवणूक आणि वैयक्तिक माहिती चोरण्याच्या घटनांमध्ये वाढ होऊ शकते, असा इशारा सायबर सुरक्षा क्षेत्रातील आर्क्टिक वुल्फ या कंपनीने दिला आहे.

कंपनीचे भारतातील अभियांत्रिकी विभागाचे उपाध्यक्ष देवेंद्र राठ यांच्या मते, सणासुदीच्या काळात ग्राहक आणि व्यवसायांसाठी अनेक संधी निर्माण होतात; मात्र, याच काळाचा फायदा सायबर गुन्हेगारही घेतात. आकर्षक ऑफर, एमर्जन्सी मेसेजेस आणि विश्वासार्ह वाटणाऱ्या लिंकच्या माध्यमातून लोकांना फसवण्याचे प्रकार वाढण्याची शक्यता आहे. सायबर गुन्हेगार ऑनलाइन खरेदीवरील मोठ्या सवलती, कुरिअर किंवा डिलिव्हरीचे संदेश, लॉयल्टी रिवॉर्ड, बँकिंग अलर्ट, करासंबंधी सूचना, बनावट बिले आणि खाते पडताळणीच्या नावाखाली फसवणूक करू शकतात. ग्राहकांना एसएमएस, व्हॉट्सअॅप ई-मेल आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून संशयास्पद लिंक पाठवल्या जाऊ शकतात. संशोधकांच्या निरीक्षणानुसार, अनेक यशस्वी सायबर हल्ल्यांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानापेक्षा लोकांचा विश्वास, घाई आणि परिचित व्यक्ती किंवा संस्थेच्या नावाचा वापर केला जातो.

## महिला अत्याचाराच्या तक्रारीत पीडितांना दोष देऊ नका; राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या सूचना

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**
महिला अत्याचाराची तक्रार नोंदवण्यासाठी पोलिस ठाण्यात येणाऱ्या पीडितांना दोष देणे, नैतिकतेचे धडे देणे किंवा त्यांची बदनामी करणे टाळावे, असे राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने (एनएचआरसी) स्पष्ट केले आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी २३ ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या सल्लापत्रात पोलिसांना अधिक संवेदनशील बनवण्यासह रात्रीच्या वेळी निर्जन आणि संवेदनशील भागांत गस्त वाढवण्याची शिफारस करण्यात आली आहे.

रिव्हेंज पॉर्न, डॉक्सिंग, संमतीशिवाय अश्लील छायाचित्रे-व्हिडिओ प्रसारित करणे आणि डीपफेक यांसारख्या डिजिटल अत्याचारांबाबत महिलांमध्ये जागरूकता निर्माण करण्यावर आयोगाने भर दिला आहे. शाळा, महाविद्यालये आणि कामाच्या ठिकाणी सायबर गुन्ह्यांविषयी तसेच ऑनलाइन तक्रार नोंदवण्याच्या पद्धतींबाबत मार्गदर्शन करण्याची सूचना करण्यात आली आहे.

डिसेंबर २०२५ पर्यंत देशातील १६,१०९ पोलिस ठाण्यांपैकी १४,६५८ ठाण्यांत महिला मदत कक्ष कार्यरत होते. उर्वरित ठाण्यांतही हे कक्ष सुरू करावेत, तसेच हेल्पलाइनचा प्रतिसाद आणि घटनास्थळी पोलिस पोहोचण्याचा कालावधी निश्चित करावा, अशी शिफारस आयोगाने केली आहे.

# कर्जवसुलीच्या स्थगितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण-गोंधळ आंदोलन

## दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेचे अनोखे आंदोलन । तीव्र आंदोलन करण्याचा दिला इशारा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन बँका, पतसंस्था आणि फायनान्स कंपन्यांकडून केल्या जाणाऱ्या कर्जवसुलीला स्थगिती द्यावी, तसेच वसुलीच्या नावाखाली नागरिकांना धमकावणे, दहशत निर्माण करणे आणि मारहाण करून पैसे वसूल करण्याच्या कथित प्रकारांना आळा घालावा, या मागण्यांसाठी अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण-गोंधळ आंदोलन करण्यात आले. पारंपरिक जागरण-गोंधळाच्या माध्यमातून आंदोलकांनी कर्जवसुलीच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत कर्जाच्या हप्त्यांसाठी तगादा लावला जात असल्यास आर्थिक संकटातील नागरिकांवरील ताण आणखी वाढू शकतो. त्यामुळे परिस्थितीचा विचार करून बँका, पतसंस्था आणि फायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुलीला स्थगिती देण्याबाबत शासन व प्रशासनाने योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली.

फायनान्स कंपन्यांकडून कर्जवसुलीसाठी काही ठिकाणी अनधिकृत एजंटांची नियुक्ती केली जात असून, त्यांच्यामार्फत नागरिकांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. काही व्यक्तींकडून पैसे देण्यास नकार देणाऱ्या नागरिकांना मारहाण केली जात असल्याचा आरोपही आंदोलकांनी केला. अशा प्रकारांना विरोध करणाऱ्या स्थानिक नागरिकांना शिवीगाळ केली जात असल्याचेही संघटनेने म्हटले आहे. कर्जवसुलीच्या नावाखाली कायदा हातात घेण्याचे प्रकार घडत असतील, तर त्यांची सखोल चौकशी करून संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

शहरातील विविध चौकांमध्ये वसुली एजंटांचा वावर वाढल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचा दावा संघटनेने केला. कर्जवसुलीची प्रक्रिया कायदेशीर चौकटीतच पार पडली पाहिजे. कोणत्याही नागरिकाला धमकावणे, अपमानित करणे किंवा शारीरिक बळाचा वापर करून पैसे वसूल करणे, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी भूमिका संघटनेने मांडली.

फायनान्स कंपन्यांमधील काही कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांची खासगी माहिती बाहेरील व्यक्तींना पुरवली जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या माहितीचा गैरवापर करून काही व्यक्ती वाहनचालकांना अडवून त्यांच्याकडे पैशांची मागणी करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कर्जदारांवर घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी असली, तरी वसुली करताना कायदेशीर प्रक्रिया आणि नागरिकांच्या हक्कांचे पालन होणे आवश्यक आहे. आर्थिक



अडचणीत असलेल्या नागरिकांना कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन त्रास देण्याचे प्रकार सहन केले जाऊ नयेत.

दुष्काळी परिस्थितीचा विचार करून कर्जवसुलीला स्थगिती देण्याबाबत निर्णय घ्यावा, अनधिकृत वसुली एजंटांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवावे, धमकावणाऱ्या आणि मारहाण करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करावी, तसेच कर्जवसुलीच्या प्रक्रियेवर प्रशासनाने लक्ष ठेवावे, अशा प्रमुख मागण्या या आंदोलनातून करण्यात आल्या. या आंदोलनात अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे, छावा संघटना भटके-विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुभाष काकडे, जिल्हाध्यक्ष उत्तम पवार, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, स्वराज्य पक्षाचे जिल्हाप्रमुख योगेश शेंडगे, जनार्दन कंद, शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, आबा राठोड, किसन शिरडकर, मच्छिंद्र पाटोळे, साहेबराव पाटोळे, दत्ता वामन, ज्योती माळी, मुक्ता शेडाळे, अभिषेक घोडके, रामदास मोढवे, विजया पवार, मालनबाई गरड, संगीता वाल्हेकर, एकनाथ दातीर, महादेव खामकर, विष्णू जरे, भानुदास ससे आणि बाळासाहेब फाटके आदी सहभागी झाले होते.

# SPOT NEWS

## पूनम काकडे व किरण खेडकर यांची आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड

● **पाथर्डी । वीरभूमी-**

सकलचंद पटेल युनिव्हर्सिटी, मेहसाणा, गुजरात येथे आयोजित करण्यात येणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धे साठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघात बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची निवड झाली आहे. मुलींच्या ७७ किलो वजन गटात पूनम काकडे, तर मुलांच्या ९५ किलो वजन गटात किरण खेडकर या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत भारतातील महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश व गोवा या पाच राज्यांमधील मुलांचे ५०, तर मुलींचे ३५ विद्यापीठ संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेमधून किट युनिव्हर्सिटी, भुवनेश्वर, ओडिसा येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड केली जाणार आहे.निवड झालेल्या खेळाडूंना महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. विजय देशमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव आव्हाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.





## जंगलतोडीविरोधात पिपल्स हेल्पलाईनचा राज्यव्यापी 'भीमाशंकर सत्याग्रह'

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

भीमाशंकर-कर्जत परिसरातील जंगलांचे संरक्षण आणि वृक्षतोडीला विरोध करण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने 'भीमाशंकर सत्याग्रह' या राज्यव्यापी अहिंसक अभियानाची घोषणा करण्यात आली आहे. पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी ही माहिती दिली. कर्जत तालुक्यातील टोरंट पॉवरच्या ३ हजार मेगावॅट क्षमतेच्या सायडोंगर-१ पंप्ड स्टोरेज प्रकल्पासाठी २३३ हेक्टर वनजमीन वळविण्याची आणि ३२ हजार ४९० झाडे तोडण्याची परवानगी मिळाल्याच्या वृत्तांतर संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे. वृक्षतोड थांबविल्याचे वृत्त असले, तरी स्थगितीचा कालावधी आणि पुढील कार्यवाही स्पष्ट करणारा लेखी आदेश शासनाने सार्वजनिक करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. कंपनीने हा प्रकल्प भीमाशंकर अभयारण्याच्या पर्यावरणसंवेदनशील क्षेत्राबाहेर असल्याचे सांगत सुमारे ९० हजार झाडे लावण्याचे नियोजन जाहीर केले आहे. मात्र, प्रस्तावित वृक्षारोपणाची ठिकाणे, झाडांची निगा आणि प्रत्यक्ष जगलेल्या झाडांची संख्या यांची स्वतंत्र तपासणी करावी. तसेच नैसर्गिक जंगल, जलस्रोत आणि वन्यजीवांच्या अधिवासावर होणाऱ्या परिणामांचा शास्त्रीय अभ्यास करावा, अशी मागणी संघटनांनी केली आहे. प्रकल्पाचा पारदर्शक पर्यावरणीय फेरआढावा घ्यावा, सर्व मंजुऱ्या, नकाशे, वृक्षगणना, जनसुनावणीचे इतिवृत्त आणि ग्रामसभांच्या नोंदी मराठीत सार्वजनिक कराव्यात. पेज नदीच्या खोऱ्यावरील परिणाम तपासून बाधित ग्रामस्थ व आदिवासी समुदायांच्या हक्कांबाबत स्पष्ट हमी द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# गुप्तधनाच्या आमिषाने शेतात अघोरी पूजा

## शेंडी गावठाण शिवारातील प्रकार । राजूर पोलिसांकडून सात जणांना अटक

● **अकोले । वीरभूमी -**

गुप्तधन काढून देण्याच्या बहाण्याने शेतात रात्रीच्या वेळी अघोरी पूजा व जादूटोणा केल्याचा प्रकार अकोले तालुक्यातील शेंडी गावठाण शिवारात उघडकीस आला आहे. या प्रकरणी ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे सात जणांना पकडण्यात आले असून, राजूर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे. घटनास्थळावरून एक स्विफ्ट कार आणि एक स्प्लेंडर मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



शेतकरी एकनाथ दगडू भांगरे (वय ५७) यांच्या फिर्यादीनुसार, २७ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास शेंडी गावठाण शिवारात हा प्रकार घडला. भांगरे हे आपल्या शेतात भात पिकाला पाणी देत असताना त्यांना शेतात संशयास्पद उजेड दिसला. त्यामुळे त्यांनी तातडीने शेजारील ग्रामस्थांना बोलावून घेतले.

ग्रामस्थांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, आठ ते नऊ इसम कापूर, अगरबत्ती, लिंबू आणि उडीद ठेवून गुप्तधन मिळविण्यासाठी पूजा करत असल्याचे आढळले. गुप्तधनावरील भूत काढण्यासाठी मंत्रोच्चार करून जागा खोदायची आणि मिळणारे धन आपापसांत वाटून घ्यायचे, अशा प्रकारची अंधश्रद्धा पसरविणारी कृती सुरू असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

ग्रामस्थांनी अचानक धाव घेतल्याने संबंधित इसम पळू लागले. मात्र, ग्रामस्थांनी पाठलाग करून त्यातील सात जणांना पकडले. त्यानंतर ग्रामस्थांनी डायल ११२ वर संपर्क साधला. माहिती मिळताच राजूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सात जणांना ताब्यात घेतले. घटनास्थळावरून एक स्विफ्ट कार आणि एक स्प्लेंडर मोटारसायकल जप्त करण्यात आली.

या प्रकरणात पोलिसांनी योगेश गणेश वानखेडे, त्र्यंबक रावजी वानखेडे, अनंता कृष्णराव हिंगोले, गणेश रामहरी घोरपडे, रूपेश गणेश वानखेडे (वरील पाचही जण रा. अकोले), ज्ञानेश्वर नामदेव लेंडे (रा. पाभुळवंडी, ता. अकोले), संजय लक्ष्मण खाडे (रा. बारी, ता. अकोले) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत.

याप्रकरणी शेतकरी एकनाथ भांगरे यांच्या फिर्यादीवरून राजूर पोलीस ठाण्यात अघोरी प्रथा व नरबळी प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अकोलेचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी आणि सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार पुढील तपास करीत आहेत.

# दहा वर्षांनंतर दरेकर बंधूंची खोट्या गुन्ह्यातून सुटका

### दिवाणी जमीनवादातून दरोड्याचा गुन्हा दाखल केल्याचा आरोप

● **श्रीगोंदा । वीरभूमी -**

हिरडगाव फाटा येथील न्यू जयभवानी हॉटेलचे मालक माधव जाधव यांच्या कुटुंबीयांना मारहाण करून सोन्याचे दागिने लुटल्याच्या आरोपावरून दाखल झालेल्या दरोड्याच्या खटल्यातून दत्तात्रय मोहन दरेकर व सचिन मोहन दरेकर या बंधूंची तब्बल दहा वर्षांनंतर खोट्या गुन्ह्यातून सुटका झाली. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी या खटल्याचा निकाल लागला. दिवाणी जमीनवादाच्या पार्श्वभूमीवर दाखल झालेल्या या प्रकरणामुळे दरेकर बंधूंना दीर्घकाळ न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागले. त्यामुळे त्यांना आर्थिक खर्चासह मानसिक मनस्ताप सहन करावा लागल्याचा मुद्दा चर्चेत आला आहे.

या प्रकरणात तत्कालीन पोलिस निरीक्षक भरत मोरे यांच्या तपासाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. फिर्यादी कविता माधव जाधव यांच्या उलटतपासात जमीनविषयक दिवाणी दावा, तक्रारीपूर्वी झालेली चर्चा आणि दागिने व रोख रकमेबाबत कागदोपत्री पुरावा नसल्याच्या बाबी नोंदविण्यात आल्या. या खटल्याची सुनावणी जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश-२ एस. एच. साळुंखे यांच्या न्यायालयात झाली.

दरेकर बंधूंच्या वतीने ॲड. संग्राम देशमुख यांनी युक्तिवाद केला. त्यांना ॲड. विशाल झराड, ॲड. अमोल मांडे, ॲड. योगिता कांडेकर, ॲड. संजीवनी काळे, ॲड. तुषार कोथिंबीरे आणि ॲड. अनुष्का चंदन यांनी सहकार्य केले. या निकालामुळे दरेकर बंधूंना दिलासा मिळाला असून, गंभीर गुन्ह्यांच्या तक्रारींची सत्यता पडताळून निष्पक्ष तपास करण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# पाथर्डीत टंगटाय शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी

## शस्त्रक्रियेमुळे २२ चिमुकल्यांना मिळाला नवा आत्मविश्वास

● **पाथर्डी । वीरभूमी-**

राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर आणि पंचायत समिती, पाथर्डी शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित टंगटाय शस्त्रक्रिया शिबिरात विविध जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या २२ विद्यार्थ्यांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.



ग्रामीण रुग्णालय, पाथर्डी येथे झालेल्या या शिबिरात वैद्यकीय शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. महावीर कटारिया यांनी शस्त्रक्रिया पार पाडल्या. सेवा संकल्प अभियानांतर्गत (१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर) ० ते १८ वयोगटातील अंगणवाडी व शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत तपासणी व उपचार उपलब्ध करून देण्यात आले होते. संबंधित विद्यार्थ्यांची भरती करून आवश्यक तपासण्या करण्यात आल्या होत्या.

या वेळी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सचिन राख, विस्तार अधिकारी तथा शालेय पोषण अधीक्षक रामनाथ कराड, व सर्व विशेष शिक्षक उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना धीर दिला आणि पालकांना मार्गदर्शन केले. या शिबिरासाठी समावेशित शिक्षण अंतर्गत पालक व विद्यार्थी यांना प्रवास भत्ता वाटप करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना बोलताना येणाऱ्या अडचणी दूर होण्यास मदत होणार असून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला व आत्मविश्वासाला चालना मिळेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. मोफत व दर्जेदार आरोग्य सेवेबद्दल पालकांनी समाधान व्यक्त करून आयोजकांचे आभार मानले. पालकांनी आपल्या पाल्यांची आरोग्य तपासणी करून घ्यावी आणि अशा मोफत सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन गटशिक्षणाधिकारी सचिन राख यांनी यावेळी केले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी विषय शिक्षक नोडल अधिकारी राहुल अकोलकर, सहायक नोडल अधिकारी श्री. लाड, विशेष शिक्षक विशाल टिपरे व इतरांनी विशेष परिश्रम घेतले.

## डॉ. विखे पाटील फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंगच्यावतीने

# 'रुग्ण सुरक्षा व गुणवत्ता सुधारणा' विषयावर नर्सिंग सीएनईचे आयोजन

## २१२ परिचारिकांचा सहभाग । महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडून १० क्रेडिट पॉइंट्स

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर येथील कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभागाच्या वतीने महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई यांच्या सहकार्याने 'रुग्ण सुरक्षा व नर्सिंग व्यवस्थापनातील गुणवत्ता सुधारणा' या विषयावर सातत्यपूर्ण नर्सिंग शिक्षण कार्यक्रम (सीएनई) आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडून १० क्रेडिट पॉइंट्स प्रदान करण्यात आले. या उपक्रमाचा २१२ परिचारिकांनी लाभ घेतला.

रुग्ण सुरक्षा सुनिश्चित करणे, नर्सिंग सेवांची गुणवत्ता सुधारणे, रुग्णसेवेतील संभाव्य धोके कमी करणे तसेच सुरक्षित आणि प्रभावी नर्सिंग व्यवस्थापनासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्ये अद्ययावत करणे, हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमासाठी सेंट ल्यूक कॉलेज ऑफ नर्सिंग अँड हॉस्पिटल, श्रीरामपूरच्या प्राचार्या रिना जॉर्ज यांनी महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या निरीक्षक म्हणून काम पाहिले. मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या, रुग्णांच्या सुरक्षिततेमध्ये परिचारिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. रुग्णांना सुरक्षित व गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी परिचारिकांनी रुग्ण सुरक्षा प्रोटोकॉल, अद्ययावत मार्गदर्शक तत्त्वे आणि गुणवत्ता सुधारणा प्रक्रियांबाबत आपले ज्ञान सतत अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. रुग्ण सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करूनच सुरक्षित, प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण नर्सिंग सेवा प्रदान करता येते.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक (वैद्यकीय) प्रा. डॉ. अभिजित दिवटे आणि मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. रामचंद्र पडळकर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा चांदेकर, डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलच्या मेट्रन जया गायकवाड, तसेच महाविद्यालयाच्या प्राध्यापिका, उपप्राचार्या आणि कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभागप्रमुख प्रा. डॉ. योगिता औताडे यांच्या मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळे कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

डॉ. योगिता औताडे, डॉ. आम्रपाली संतोष, एनबीएच समन्वयक प्रा. अमोल टेमकर, प्रा. सलोमी तेलधुने आणि डॉ. कविता भोकनळ यांनी व्याख्याते म्हणून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमामुळे सहभागी परिचारिकांना रुग्ण सुरक्षा, गुणवत्ता सुधारणा आणि सुरक्षित नर्सिंग व्यवस्थापनासंदर्भात अद्ययावत ज्ञान मिळाले. तसेच रुग्णकेंद्रित, सुरक्षित आणि प्रभावी आरोग्यसेवा देण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळाली.



कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभागातील राहुल कडू, अमोल अनाप, गणेश घोलप, विशाल पुलाटे, दिनेश मगर, प्रशांत अम्ब्रीत, संपदा म्हस्के आणि स्नेहल घोडेराव यांनी विशेष सहकार्य केले. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई यांच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमामुळे नर्सिंग व्यावसायिकांच्या ज्ञानवृद्धीला तसेच गुणवत्तापूर्ण आणि सुरक्षित रुग्णसेवेला प्रोत्साहन मिळाले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# कामगार कल्याण मंडळाकडून कामगारांना आर्थिक, मानसिक आधार

## अनिल शेवाळे । देवगड येथे १७ व्या राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**● नेवासा । वीरभूमी–**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत विविध उद्योगांतील कामगारांना विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिक मदत, तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आणि भजन स्पर्धांच्या माध्यमातून मानसिक आधार देण्याचे काम केले जात आहे, असे प्रतिपादन लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनिल शेवाळे यांनी केले.




नेवासा तालुक्यातील देवगड येथे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने दि. २६ ते २८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित १७ व्या राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिराचा समारोप बुधवारी (दि. २८) श्रीकृष्ण महाराज उगले यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून शेवाळे बोलत होते.

कार्यक्रमास महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या नाशिक विभागाच्या सहायक आयुक्त भावना बच्छाव, जळगावचे कल्याण अधिकारी सत्यजीत चौधरी, साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे उपाध्यक्ष डी. एम. निमसे, कामगार नेते अशोकराव पवार, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे कामगार संचालक सुखदेव फुलारी, कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे आणि शिबिर संचालक कृष्णा महाराज उगले उपस्थित होते.

यावेळी डी. एम. निमसे म्हणाले की, कामगार कल्याण मंडळामार्फत कामगार, त्यांचे पाल्य आणि कुटुंबीयांसाठी आजार मदत निधी, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती, परदेश दौरा शिष्यवृत्ती, गुणवंत कामगार पुरस्कार, विविध क्रीडा स्पर्धा, भजन–गायन व नाट्य स्पर्धा आदी उपक्रम राबविले जात आहेत. कामगारांच्या सर्वांगीण सुखासाठी मंडळ कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक करताना सहायक आयुक्त भावना बच्छाव यांनी मन:शांती देणाऱ्या देवगड तीर्थक्षेत्री आयोजित करण्यात आलेल्या भजन प्रशिक्षण शिबिराला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे सांगितले.

उदय महाराज राणे (ठाणे) आणि पांडुरंग महाराज बुनगे (नाशिक) यांनीही मनोगत व्यक्त केले. तीन दिवसीय निवासी भजन प्रशिक्षण शिबिराचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल त्यांनी सहायक आयुक्त भावना बच्छाव आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले.

यावेळी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे अहिल्यानगर केंद्रप्रमुख अनिल बोरसे, भास्कर शिरोळे, निलेश वाघ, शशिकांत पाटोळे, पंकज देशमुख, विवेक देशमुख, संदीप चव्हाण, राजेंद्र नांद्रे, संदीप पवार, योगेश पाटील, वंदना पवार, वैशाली सोनवणे, प्रीती पाटील, कविता कासार, रमेशानंदगिरीजी महाराज, सागर महाराज टेमक, अमोल महाराज पानमंद, भास्कर महाराज मुळक, तुषार महाराज तागड, अमोल महाराज धाडगे, संभाजीराव माळवदे, अण्णासाहेब गर्जे, पोपटराव उगले, अशोक धुमाळ, अप्पासाहेब बोडखे, श्रीरंग जाधव, दादासाहेब मरकड, सचिन मरकड, शंकर भारस्कर, अरुण घोडके आदी उपस्थित होते.

कल्याण निरीक्षक महेश विभांडिक यांनी सूत्रसंचालन केले, तर कल्याण निरीक्षक शशिकांत पाटोळे यांनी आभार मानले. पसायदानाने शिबिराची सांगता झाली.

# SPOT NEWS

## पारनेरमध्ये ४ नोव्हेंबरला महसूल लोकअदालत; प्रलंबित जमीनविषयक दावे निकाली काढणार

**● पारनेर । वीरभूमी –**

महसूल प्रशासनातील अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेले जमिनीविषयक दावे आणि विविध महसुली वाद परस्पर संमतीने निकाली काढण्यासाठी पारनेर तहसील कार्यालयात ४ नोव्हेंबर रोजी महसूल लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या संबंधित पक्षकारांनी आवश्यक कागदपत्रांसह २८ ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन तहसीलदार गायत्री सौंदाणे यांनी केले आहे.महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्णयानुसार राज्यभरात १ सप्टेंबर ते ३१ मार्च या कालावधीत 'महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोकअदालत अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश महसूल न्यायालयांमध्ये दीर्घकाळ प्रलंबित असलेली प्रकरणे सामोपचाराने आणि जलदगतीने निकाली काढणे हा आहे. न्यायालयीन प्रक्रियेमध्ये लागणारा वेळ कमी करून नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने या उपक्रमाला महत्त्व प्राप्त झाले आहे. या लोकअदालतीमध्ये दरखास्त दावे, रस्ता वहिवाटीसंबंधी वाद, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम १४३ अन्वये दाखल प्रकरणे, तसेच मामलतदार न्यायालय अधिनियम १९०६ मधील कलम ५ (२) अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांचा समावेश आहे. याशिवाय वारस नोंदी, अधिकार अभिलेखासंबंधी वाद, ज्येष्ठ नागरिकांचे निर्वाह व कल्याण अधिनियमांतर्गत प्रकरणे आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम ८५ नुसार वाटपाची प्रकरणेही लोकअदालतीत विचारार्थ घेतली जाणार आहेत.जमिनीच्या हद्दी, रस्त्याची वहिवाट, वारस नोंदी आणि अन्य महसुली बाबींवरून अनेकदा नागरिकांमध्ये वाद निर्माण होतात. अशा प्रकरणांमध्ये परस्पर संमतीने तोडगा निघाल्यास संबंधित पक्षकारांचा वेळ आणि खर्च वाचण्यास मदत होते. तसेच न्यायालयांवरील प्रलंबित प्रकरणांचा भार कमी होण्यासही हातभार लागतो. त्यामुळे संबंधित पक्षकारांनी या संधीचा लाभ घेऊन विहित मुदतीत अर्ज सादर करावेत. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडून महसूल लोकअदालतीच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन तहसीलदार गायत्री सौंदाणे यांनी केले आहे.

## भाजपा वाहतूक सेलच्या जिल्हाध्यक्षपदी बाबासाहेब शिंदे यांची नियुक्ती

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

भाजपा प्रणित नवभारतीय शिववाहतूक संघटना/भाजपा वाहतूक सेलच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी बाबासाहेब बाबुराव शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी अराफात शेख यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. बाबासाहेब शिंदे यांच्या निवडीबद्दल अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पालकमंत्री विखे यांनी वाहतूकदारांच्या हिताचे रक्षण करणे, त्यांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांना शासना पर्यंत पोहचवून ते प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याचे सांगितले. सत्काराला उत्तर देताना नवनियुक्त जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बाबुराव शिंदे यांनी वाहतूकदारांच्या न्याय्य हक्कांसाठी सदैव तत्पर राहून काम करण्याची ग्वाही दिली. संघटनेने आपल्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असून, वाहतूकदारांच्या हिताला प्राधान्य देत त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी योगदान देणार आहे. जिल्ह्यातील वाहतूक क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यावसायिकांच्या प्रश्नांना संघटनेच्या माध्यमातून प्रभावीपणे सोडविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या नियुक्तीबद्दल भाजपाच्या आजी–माजी पदाधिकाऱ्यांनी बाबासाहेब शिंदे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात 'मिशन खाकी' उपक्रम

### ४०० मीटर धावपट्टी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन



**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पोलिस भरतीसाठी मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने विद्यार्थी समन्वयक कक्ष व स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने १६ ऑक्टोबर रोजी 'मिशन खाकी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या वेळी विद्यार्थी सहायता कक्षाचे समन्वयक उद्धव ढवळे यांनी पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्रीगोंदा नगरपरिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सरावासाठी ४०० मीटरची धावपट्टी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच, गुजरात राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातील पोलिस भरती प्रक्रियेत राज्य सरकारकडून आगामी काळात विविध बदल करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे होते. स्पर्धा परीक्षा विभागाचे प्रमुख प्रा. अनिल ढवळे यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. संजय फटे यांनी पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी मांडल्या, तर प्रा. संदीप दरेकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे आभार प्रा. विजय मगर यांनी मानले.

## इसळक-निंबळक येथील विद्यालयात मुलींसाठी सॅनिटरी वेंडिंग व डिस्पोजल मशीनचे लोकार्पण

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

इसळक–निंबळक (ता. नगर) येथील ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालयात कृष्णाप्रीत वेल्फेअर फाउंडेशन यांच्या वतीने आणि व्होगनस प्रा इंडिया लिमिटेड यांच्या सहकार्याने विद्यार्थिनींच्या आरोग्य व वैयक्तिक स्वच्छतेच्या दृष्टीने सॅनिटरी पॅड व्हेन्डिंग मशीन व डिस्पोजल मशीनचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. तसेच शालेय मुलींना मोफत सॅनिटरी पॅड वितरण व आरोग्य शिबीराचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने झाली. मान्यवरांचे स्वागत विद्यालयाच्या लेझीम पथकाने केले. यावेळी नवदुर्गा शक्तिरूपात सजलेल्या विद्यार्थिनींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या विविध रूपांची उपस्थितांना ओळख करून देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हॉगनास इंडिया प्रा. लि.चे प्लांट हेड शरद मगर होते. कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचे संचालक प्रशांत पाटील शेळके तसेच संस्थेचे सहसचिव अविनाश कोतकर, जगताप हॉस्पिटलच्या वैद्यकीय मार्गदर्शक डॉ. नयना जगताप, सेवानिवृत्त सिव्हिल हॉस्पिटल मेट्रन छायाताई निमसे, एमआयडीसीतील उद्योजक राजेंद्र गायकवाड, कु. वृषाली अबुज, सरपंच प्रियंका लामखडे, मेजर भागवत शेळके, मेजर रावसाहेब शेळके, उद्योजक सुनील शिंदे, आरोग्य अधिकारी आकाश बोरबने आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. नयना जगताप यांनी विद्यार्थिनींना 'कळी उमलताना' या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. किशोरवयातील शारीरिक व मानसिक बदल, मासिक पाळीविषयी योग्य माहिती, वैयक्तिक स्वच्छता, आरोग्याची काळजी आणि या विषयांबाबत असलेले गैरसमज दूर करण्याचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. तसेच विद्यार्थिनींनी कोणताही संकोच न बाळगता आरोग्यविषयक समस्यांबाबत जागरूक राहावे, असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात शरद मगर यांनी विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक गरजा, वैयक्तिक स्वच्छता आणि शिक्षणातील आत्मविश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थिनींचे भविष्य उज्ज्वल घडविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगत विद्यालयातील विद्यार्थिनींची संख्या वाढविण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

विद्यार्थिनींना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनने केलेले सहकार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्य व स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे ज्येष्ठ क्रीडा शिक्षक बांडे सर यांनी केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती जाजगे मॅडम, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियोजनातून हा कार्यक्रम यशस्वी पार पडला. मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीकोनाने हा उपक्रम राबविल्याबद्दल मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी आभार व्यक्त केले.

# ज्येष्ठ नागरिक संघाचा कोजागिरी पौर्णिमा उत्सव उत्साहात

## भजन, गायन व सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगली ज्येष्ठांची मैफल । स्नेह, आपुलकी आणि सामाजिक एकोप्याचा सुंदर संगम

**● पाथर्डी । वीरभूमी–**

ज्येष्ठ नागरिक संघ, पाथर्डी यांच्या वतीने आयोजित कोजागिरी पौर्णिमा उत्सव अत्यंत उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. श्रीगणेश पूजनाने कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात झाली. त्यानंतर सादर झालेल्या भजन, गायन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांची मने जिंकली. परस्परांतील स्नेहबंध दृढ करण्याबरोबरच ज्येष्ठांना एकत्र येण्याची, आनंदाचे क्षण अनुभवण्याची आणि सामाजिक एकोप्याची भावना वृद्धिंगत करण्याची संधी या उत्सवाच्या माध्यमातून मिळाली जेष्ठ वयोवृद्धांना मिळाली.

ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रामनाथ बंग यांच्या मार्गदर्शनाखाली बंग मित्र परिवाराच्या मोलाच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनातील आनंद, उत्साह आणि सामाजिक सहभागाला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी संस्मरणीय ठरला.

या उत्सवाला पाथर्डी नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक विशाल डहाळे, आरोग्य विभाग निरीक्षक शुभम काळे, पाणीपुरवठा विभाग निरीक्षक दिनेश पवार, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र दुधाळ तसेच पावन गणपती प्रतिष्ठानचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते अजिनाथ भाऊ डोमकावळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

ज्येष्ठ नागरिकांचे सामाजिक जीवन अधिक आनंदी आणि उत्साही बनविण्यासाठी अशा स्नेहमेळाव्यांचे महत्त्व व गरज असल्याचे संघाचे संस्थापक सदस्य व माजी प्राचार्य भगिरथ उरणकर यांनी सांगितले.

या उत्सवाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात भजन, गायन आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी वातावरण भक्तिमय व आनंदमय झाले. दैनंदिन जीवनातील व्यस्ततेतून वेळ काढून एकत्र आलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी या सोहळ्याचा मनमुराद आनंद घेतला.

अशा कार्यक्रमांमुळे ज्येष्ठ नागरिकांना आपले अनुभव, विचार आणि आठवणी एकमेकांशी शेअर करण्याची संधी मिळते. तसेच नव्या पिढीशी संवाद वाढविणे, सामाजिक संबंध दृढ करणे आणि ज्येष्ठांच्या अनुभवसंपन्न योगदानाचा सन्मान करणे शक्य होते. या उत्सवातूनही स्नेह, जिव्हाळा आणि परस्पर सहकार्याची भावना प्रकर्षाने दिसून येते अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन आणि व्यवस्थापन यशस्वी करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी व विश्वस्त मंडळींनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये उपाध्यक्ष सुभाषशेठ भंडारी, दयानंद जिरेसाळ, संजय भोंडे, ॲड. राजेंद्र मंत्री, प्रकाश गुरसाळी, सौ. रत्नमाला उदमले, रेखा केळकर आणि सुभाष रोडी यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.



या कार्यक्रमासाठी अल्पोपहाराची व्यवस्था नाना राऊत आणि पप्पू चौनापूरे यांच्या सौजन्याने करण्यात आली होती.

ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने आयोजित या उत्सवाने सामाजिक बांधिलकीचे दर्शन व सर्वांच्या सहकार्याने आणि उत्स्फूर्त सहभागाने हा सोहळा आनंदात संपन्न झाला. ज्येष्ठांचा सन्मान, सामाजिक एकोपा आणि आपुलकीचा संदेश देणारा हा उत्सव उपस्थितांच्या स्मरणात राहणारा ठरला. शेवटी रामनाथ बंग यांनी सर्वांचे आभार मानले.

# पाथर्डीत पोलीस ठाण्याजवळच धाडसी घरफोडी

## बंद घर फोडून १० लाख १४ हजारांचा ऐवज लंपास | पाथर्डीत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**पाथर्डी । वीरभूमी –**
पाथर्डी शहर व तालुक्यात घरफोडी, वाहनचोरी, पशुधन चोरी, शेतीची अवजारे चोरी, दागिने चोरी, खिसेकापू आणि रस्तालुटीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. अनेक प्रकरणांत गुन्हे दाखल होऊनही तपासाचे काय झाले, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील नवीन पोलीस ठाण्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या फुलेनगर परिसरातील समर्थ कॉम्प्लेक्समध्ये बंद घर फोडून चोरट्यांनी १० लाख १४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त होत आहे.

फुलेनगर येथील रहिवासी व व्यावसायिक संतोष भगवान खेडकर (वय ४२) हे कौटुंबिक कार्यक्रमासाठी कुटुंबासह मुंबई येथे गेले होते. घर बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी मुख्य दरवाजाचा कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील शोकेस आणि दिवाणाच्या कप्प्यांची तोडफोड करून मौल्यवान वस्तूंची शोधाशोध केली.

चोरट्यांनी १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि ९ लाख ९० हजार रुपये रोख, असा एकूण १० लाख १४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

चोरी करताना शेजाऱ्यांना संशय येऊ नये किंवा त्यांनी बाहेर पडू नये, यासाठी चोरट्यांनी आसपासच्या घरांच्या दरवाजांना बाहेरून कड्या लावल्याची माहिती समोर आली आहे. सकाळी घरमालक अजिंक्य खेडकर यांना घर उघडे दिसल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला.

या घटनेतील चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून, त्यांची संख्या पाच ते सहा असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच पाथर्डी पोलिसांनी श्वानपथक आणि ठसेतज्ज्ञांच्या मदतीने घटनास्थळी पाहणी केली.

संतोष खेडकर यांच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रोहन खंडागळे करीत आहेत. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

शहर व तालुक्यात घरफोडी, वाहनचोरी, पशुधन चोरी आणि इतर चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्याबरोबरच गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी पोलीस प्रशासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.



पोलीस ठाण्यापासून जवळच घरफोडी झाल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. शहरातील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करावी, रात्रीची गस्त वाढवावी आणि घरफोडीतील आरोपींना लवकरात लवकर शोधून काढावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. शहरातील वाढत्या चोऱ्यांना आळा कधी बसणार, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

# पाच-सहा महिने मीटर रीडिंग नाही; वीजबिलांचा भुर्दंड ग्राहकांच्या माथी!

## 'मीटर फॉल्ट'च्या नावाखाली नवीन मीटर बसविण्याचा आग्रह? ग्राहकांमध्ये नाराजी

**अकोले । वीरभूमी–**
अकोले तालुक्यात घरगुती वीज मीटरचे रीडिंग वेळेवर घेतले जात नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. काही ठिकाणी पाच ते सहा महिने मीटर रीडिंग घेण्यासाठी कर्मचारी येत नसल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. मात्र, त्यानंतर अचानक वीजबिले पाठविली जात असल्याने सर्वसामान्य ग्राहकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. तसेच, मीटरमध्ये दोष असल्याचे सांगून नवीन मीटर बसविण्याचा आग्रह धरला जात असल्याच्या तक्रारींमुळेही ग्राहकांमध्ये नाराजी आहे. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी अकोले तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष अमोल बाळासाहेब नाईकवाडी यांनी केली आहे.

घरगुती वीज ग्राहकांनी नियमितपणे वीजबिल भरणे अपेक्षित असताना, मीटर रीडिंग वेळेवर घेतले जात नसेल तर त्याची जबाबदारी



कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अनेक महिन्यांचे रीडिंग एकाच वेळी घेतल्यास किंवा अंदाजे वीजवापराच्या आधारे बिल आकारले गेल्यास ग्राहकांना मोठ्या रकमेचे बिल येण्याची शक्यता असते. त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे मासिक आर्थिक नियोजन कोलमडू शकते.

वीज ग्राहकांना प्रत्यक्ष वापरानुसार आणि नियमानुसार बिल मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे मीटर रीडिंग नियमित घेण्याबरोबरच बिल आकारणीतील पारदर्शकता राखण्याची गरज व्यक्त होत आहे.

काही ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, मीटरमध्ये दोष असल्याचे सांगून नवीन मीटर बसविण्याचा आग्रह धरला जातो. मात्र, संबंधित मीटर खरोखरच नादुरुस्त आहे का, त्याची तांत्रिक तपासणी केली जाते का आणि मीटर बदलण्यामागील कारण ग्राहकांना लेखी स्वरूपात दिले जाते का, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मीटरमध्ये दोष असल्यास त्याची नियमानुसार तपासणी करून ग्राहकांना वस्तुस्थिती समजावून सांगणे आवश्यक आहे. मीटर बदलण्याची गरज असल्यास त्यामागील कारण, लागू नियम आणि संभाव्य खर्च यांची स्पष्ट माहिती ग्राहकांना द्यावी. योग्य माहिती न देता किंवा ग्राहकांच्या शंकांचे निरसन न करता मीटर बदलण्याचा आग्रह धरला जात असल्यास अशा तक्रारींची चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

वीज ही प्रत्येक घराची मूलभूत गरज असल्याने मीटर रीडिंग, वीजबिल आकारणी आणि मीटर बदलण्याची प्रक्रिया पारदर्शक असणे आवश्यक आहे. अकोले तालुक्यात नियमित मीटर रीडिंग घेतले जाते का, ग्राहकांना प्रत्यक्ष वीजवापरानुसार बिले दिली जातात का आणि मीटर बदलण्याची प्रक्रिया नियमानुसार केली जाते का, याची तपासणी संबंधित अधिकाऱ्यांनी करावी, अशी मागणी नाईकवाडी यांनी केली आहे.

अनेक महिन्यांपासून मीटर रीडिंग न घेतलेल्या ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करावे. चुकीची किंवा अवाजवी बिल आकारणी झाल्याचे आढळल्यास नियमानुसार बिलांमध्ये दुरुस्ती करावी. ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी नियमित मीटर रीडिंग, योग्य बिल आकारणी आणि मीटर बदलण्यापूर्वी आवश्यक तांत्रिक तपासणी या बाबींवर महावितरणने भर द्यावा, अशी मागणी अकोले तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष अमोल बाळासाहेब नाईकवाडी यांनी केली आहे.

# भीमाशंकरमधील हजारो झाडांच्या कत्तलीची चौकशी करा

## भीमाशंकर वनतोडीप्रकरणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आक्रमक

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
टोरेंट पॉवर कंपनीच्या प्रकल्पाच्या अनुषंगाने भीमाशंकर परिसरातील ३० हजार ४९० झाडांची कत्तल झाल्याच्या कथित प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करावी, पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाइं), नगर शहरच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात पक्षाच्या शिष्टमंडळाने मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले. या वेळी रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, गुलाम शेख, विजय शिरसाठ, नईम शेख, स्वप्नील साठे, लकी वाघमारे, जमीर सय्यद, अरबाज शेख, अजीज शेख, जावेद सय्यद, शहबाज शेख, अजय बडोदे, योहान चाबुकस्वार, आयान शेख आणि राहुल ठोकळ आदी उपस्थित होते.

भीमाशंकर परिसर हा जैवविविधतेने समृद्ध असून पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. येथील नैसर्गिक जंगल अनेक वन्यजीव, पक्षी, कीटक आणि विविध वनस्पतींचे अधिवास आहे. जंगलामुळे पावसाचे चक्र संतुलित राहण्यास, भूजलसाठ्याचे पुनर्भरण होण्यास, जमिनीची धूप रोखण्यास आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते. अशा संवेदनशील परिसरातील मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोडीमुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होण्याची भीती रिपाइंच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

टोरेंट पॉवर कंपनीच्या प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या वृक्षतोडीची अधिकृत संख्या, संबंधित परवानग्या, पर्यावरणीय मंजुरी आणि लागू कायद्यांचे पालन झाले आहे किंवा नाही, याची सक्षम यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. वृक्षतोडीमुळे वन्यजीवांचे अधिवास, स्थानिक जलस्रोत आणि जैवविविधतेवर नेमके काय परिणाम झाले आहेत, याचे स्वतंत्र पर्यावरणीय मूल्यमापनही करण्यात यावे, असे पक्षाने म्हटले आहे.

विकास प्रकल्प राबविताना पर्यावरणीय संतुलन आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण याकडे दुर्लक्ष होता कामा नये. जंगलांचा ऱ्हास झाल्यास वन्यजीवांच्या अधिवासावर संकट निर्माण होऊ शकते. त्याचबरोबर जलचक्र, भूजलसाठा आणि मातीची सुपीकता यांवरही दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून वस्तुनिष्ठ चौकशी करणे आवश्यक असल्याची भूमिका रिपाइंने मांडली.

चौकशी पूर्ण होऊन सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी होईपर्यंत पुढील वृक्षतोडीला स्थगिती देण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकरणाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशीत नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित कंपनी, कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच नष्ट झालेल्या वनसंपत्तीची भरपाई करण्यासाठी स्थानिक पर्यावरणाला अनुरूप वृक्षलागवड आणि वनपुनर्संचयितीकरणाचा कालबद्ध आराखडा तयार करावा. लावण्यात आलेल्या झाडांची देखभाल, संवर्धन आणि वाढ यावर नियमित देखरेख ठेवावी. या प्रकल्पामुळे पर्यावरणावर झालेल्या परिणामांचा अहवाल, वृक्षतोडीसंबंधीच्या परवानग्या आणि प्रशासनाने केलेल्या कारवाईचा तपशील नागरिकांसाठी पारदर्शकपणे सार्वजनिक करावा, अशी मागणीही पक्षाने केली.

जंगलांचे संरक्षण करणे ही शासनाबरोबरच समाजाचीही सामूहिक जबाबदारी आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास रोखून भावी पिढ्यांसाठी सुरक्षित पर्यावरण जतन करणे गरजेचे आहे.

# राष्ट्रीय 'युवा मास्टर स्ट्रोक' चित्रकला स्पर्धेत वसुंधरा अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

## विविध गटांत विद्यार्थ्यांचे यश | चित्रकला शिक्षिका काजल डावखर यांचाही गौरव

**अकोले । वीरभूमी–**
विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देत त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित राष्ट्रीय स्तरावरील 'युवा मास्टर स्ट्रोक' चित्रकला स्पर्धा २०२७ मध्ये अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अकॅडमी, अकोले येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. नर्सरी ते इयत्ता दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध गटांत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलात्मक कौशल्याची छाप पाडली. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे अकॅडमीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांना कल्पनाशक्ती, निरीक्षण कौशल्य आणि सर्जनशीलतेच्या जोरावर आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्याची संधी मिळाली. विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांनी आकर्षक चित्रे साकारत परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

**विविध गटांत विद्यार्थ्यांचे यश**

**गट अ :** या गटात अनुष्का बाबासाहेब रहम हिने उत्कृष्ट चित्र साकारल्याबद्दल विशेष कौतुक मिळविले.

**गट ब :** या गटात राजवीर शिवाजी नरके (इयत्ता तिसरी, अ) याने प्रथम क्रमांक पटकावला. गार्गी संतोष वाकचौरे (इयत्ता चौथी, अ) हिने द्वितीय, तर आरूष पंडित देशमुख (इयत्ता दुसरी, ब) याने तृतीय क्रमांक मिळविला.

**गट क :** या गटात इरम आसिफ शेख (इयत्ता सहावी, ब) हिने उत्कृष्ट चित्राचा बहुमान मिळविला. निधी वैभव लाणे (इयत्ता सातवी, क) आणि फणीभूषण यशवंत खोकले (इयत्ता आठवी, अ) यांनीही चित्रकलेतून उल्लेखनीय कामगिरी केली.

**गट ड :** या गटात प्राची संतोष सावंत (इयत्ता आठवी, अ) हिने उत्कृष्ट चित्र साकारून विशेष प्रशंसा मिळविली.

विद्यार्थ्यांच्या यशासोबतच अकॅडमीच्या चित्रकला शिक्षिका काजल तुषार डावखर यांनाही त्यांच्या योगदानाबद्दल कौतुकाची भेट देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांमधील कलागुण ओळखून त्यांना प्रोत्साहन देणे, सर्जनशीलता विकसित करणे आणि चित्रकलेविषयी आवड निर्माण करणे यामध्ये शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरते.

चित्रकला हे विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्य देणारे प्रभावी माध्यम आहे. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, निरीक्षणशक्ती, एकाग्रता आणि नावीन्यपूर्ण विचार करण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होते. 'युवा मास्टर स्ट्रोक' स्पर्धेने विद्यार्थ्यांना आपले कलागुण राष्ट्रीय स्तरावर सादर करण्यासाठी उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून दिले.



विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले, कोषाध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, सहसचिव प्राचार्य अल्फोन्सा डी., उपप्राचार्य राधिका नवले आणि सर्व शिक्षकवृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे त्यांच्या प्रयत्नांबद्दल कौतुक करण्यात आले.